



दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार 3 जानेवारी २०२५ | अंक २५ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


## ग्रामीण भागात गुटखा, दारू

पात्रुड। ग्रामीण भागात पूर्वी केवळ तंबाखूपुरते असलेले व्यसन आता दारुपर्यंत पोहोचले आहे. आधुनिकीकरणाच्या काळात व्यसनांचे सर्व प्रकार आता ग्रामीण भागातही उपलब्ध झाले आहेत. गावागावांत गुटखा, मावा ते देशी विदेशी दारू सहज उपलब्ध होत आहे. ग्रामीण तरुणाईही मोठ्या प्रमाणावर व्यसनाच्या आहारी जात असल्याचे वास्तव समोर येत आहे.विशेष म्हणजे यात सर्व वयोगटातील व्यक्तींचा समावेश आहे. पूर्वी देवळात जाऊन भजन कीर्तन करणारे तरूण आता गावाच्या शेजारी असलेल्या हॉटेलात दिसू लागले आहेत. ग्रामीण भाग हा काही वर्षांपूर्वीपर्यंत व्यसनाधीनतेपासून कोसो दूर होता. फार तर तंबाखू व बिडीचे व्यसन काही लोकांना असायचे परंतु आता परिस्थिती बदलली आहे. संध्याकाळी झिंगलेले तरूण गावागावांत दिसू लागले आहेत. याला कारण ठरलेय सहज मिळणारी दारू व सामाजिक अराजकता. तंबाखूप्रमाणे आता गल्लोगल्ली दारू मिळू लागली आहे. ग्रामीण तरुणाई मोठ्या प्रमाणावर दारुच्या आहारी गेली आहे. गावठी दारूबरोबर देशी व विदेशी सर्व प्रकारची दारू गावपातळीवर मिळू लागली आहे. बदलत्या जीवन पद्धतीमुळे मद्यपान हे फॅशन झाले आहे. पूर्वीतका आई वडिलांचा व नातेवाईकांचा धाक राहिलेला नसल्यामुळे तरूणही कुणाचे ऐकत नाहीत. पार्टीमध्ये दारू प्यावी लागली,असे सांगून व्यसनावर पांघरून टाकले जाते. सुरुवातीला कधी मधी पिणारा तरूण जेव्हा रोज पिऊन येऊ लागतो, तेव्हा घरच्यांचे डोळे उघडतात. यावेळी मात्र कोणताही उपाय काम करीत नाही

### सातेफळ येथील भगवानबाबा प्रतिमेची विटंबना करणा-यां समाज कंटकावर कठोर कारवाई होणार

## सहाय्यक पोलिस अधीक्षक कमलेश मिना




-केज /प्रतिनिधी:- बीडजिल्ह्यातील केज तालुक्यातील सातेफळ ता केज जिल्हा बीड येथे काल रात्री काही अज्ञात समाज कंटका कडून राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या नावाने असलेल्या चौकातील बाबांच्या फोटो ची विटंबना जातीय तेढ निर्माण करण्यासाठी केली आहे. सदरील घटनेमुळे मोठा जातीय तेढ निर्माण होऊ शकतो तसेच संत भगवान बाबा यांच्या भक्ताच्या भावना दुखावल्या आहेत. तसेच सार्वजनिक शांतता भंग झाली आहे.या बाबतीत युसुफवडगाव पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आसुन समाज कंटकावर कठोर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन सहाय्यक पोलिस अधीक्षक कमलेश मिना यांनी दिले

# मुंब्र्यात मराठी माणसालाच कान पकडून माफी मागायला लावली

आपुल्याच घरात हाल सोसते मराठीफ, असं म्हटलं तर काही वावगं नाही. कारण मराठी बोलण्याचा हट्ट केला म्हणून एका मराठी तरुणाला अमराठी भाजी विक्रेते आणि जमावाने कान पकडून माफी मागायला लावली. विशेष म्हणजे ङ्गआम्हाला मराठी बोलता येत नाही. आम्ही मराठी बोलणार नाहीत. काय करायचं आहे ते करङ्ग, असंही गर्दीतील चेहरे बोलताना दिसले. अर्थात तरुणाने वाद घालताना ङ्गमराठी बोला, नाहीतर मुंब्रा बंद पाडेनङ्ग, असं वक्तव्य केलं होतं. त्याने अशाप्रकारचं वक्तव्य करणं योग्य नाहीच. त्याचं अजिबात समर्थन करता येणार नाही. पण महाराष्ट्रात राहायचं, व्यवसाय करायचा आणि मराठी बोलता न येणं इथपर्यंत ठीक आहे, पण मराठी बोलणारच नाही, असं छातीठोकपणे बोलणा-्या अमराठी नागरिकांना नेमका




काय मेसेज द्यायचा आहे? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतोय. त्यांना महाराष्ट्रात राहून मराठी भाषेचा द्वेष करायचा आहे का? असाही सवाल आता उपस्थित होतोय.महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईपासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा शहरात मराठी आणि हिंदी भाषेवरुन इतका वाद झाला की, मराठी तरुणाला कान पकडून माफी मागायला भाग पाडण्यात आलं. फळविक्रेताला मराठी का येत नाही? विचारले म्हणून जमावाने तरुणाला कान पकडून माफी मागायला लावली. विशेष म्हणजे मराठी तरुणावरच मुंब्रा पोलिसांनी तक्रार दाखल केली. या मराठी तरुणाला मुंब्रा येथील जमावाने प्रचंड शिवीगाळ देखील केली.

### नेमकं काय घडलं?

एक मराठी तरुण मुंब्र्यातील एका भाजी विक्रेत्याकडून फळ घेत असताना भाषेवरुन वाद झाला. मराठी तरुणाने फळ विक्रेत्याला मराठीत बोलण्यास सांगितले. त्यावरुन वाद झाला. मला मराठी येत नाही. मी हिंदीत बोलणार, असं फळ विक्रेता बोलताच मराठी तरुण ङ्गमहाराष्ट्रात रहायचे असेल तर मराठी आलेच पाहिजे, मी मुंब्रा बंद करुन टाकेनङ्ग, असं बोलू लागला. यामुळे इतर फळ विक्रेते आणि स्थानिक रहिवाशी यांनी येवून मराठी तरुणाला घेरले. मुंब्र्यात मराठी-हिंदी वाद का करतो, मुंब्रा शांत आहे शांत राहू दे, असं मुंब्र्यातील स्थानिक बोलू लागले. गर्दी वाढल्याने वाद चिघळला आणि लोकांनी त्या मराठी तरुणाला मुंब्रा पोलीस ठाणे येथे नेवून त्यावर एनसी तक्रार दाखल केली. आम्हाला मराठी येत नाही. काय करायचे ते कर, असं गर्दीतले लोकं बोलत होते. संबंधित घटना मोबाईल कॅमे-यात कैद झाली आहे. हिंदी येते तर हिंदीत बोल. वाद कशाला करतो? असं बोलून जमावाने मराठी तरुणाला पोलीस ठाण्यात जमा केले. संबंधित तरुणाचं नाव विशाल गवळी असं असल्याची माहिती आहे. त्याला त्याच्या आईने फळे आणायला पाठवले होते.

## माजी नगराध्यक्षा जिजाबाई व्यंकटराव चव्हाण यांचे निधन




नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट लोहा : लोहा येथील ज्येष्ठ महिला नागरिक तथा लोहा नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा जिजाबाई व्यंकटराव चव्हाण मुकदम यांचे दिनांक २-जानेवारी रोजी दुपारी १ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दिनांक ३-जानेवारी रोजी जुना लोहा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### अंबाजोगाईत इज्तेमा; टोलमाफीसाठी खा.सोनवणेंचे आयआरबीला पत्र

## आज अंबाजोगाईत इज्तेमाचा दुवाने समारोप

अंबाजोगाई: दोन दिवसीय इज्तेमाला गुरुवार २ जानेवारीपासून अंबाजोगाई येथे प्रारंभ झाला आहे. आज सायंकाळी मदुआफ ने समारोप होणार आहे. यासाठी परजिल्ह्यातील आणि जिल्ह्यातील मुस्लिम बांधव अंबाजोगाईला धामिर्क कार्यक्रमानिमीत्त येत असल्याने त्यांच्या वाहनांना टोलमाफी द्यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी आयआरबीचे व्यवस्थापक यांना पाठविले आहे.
अंबाजोगाई सदर बाजार चौक, येथून एक किलोमिटर अंतरावर चांदमारी रोड परिसरात या इज्तेमाचे आयोजन करण्यात आले आहे.



मुस्लिम धर्मगुरूचे उपदेश ऐकण्यासाठी भव्य शामियाना उभारण्यात आला असून वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी शेकडो स्वयंसेवकाची तैनाती करण्यात आली असून गुरुवार दि.२ जानेवारी रोजी पासून इज्तेमाला सुरुवात झाली आहे. याठिकाणी आज समारोपाच्या कार्यक्रमाला लाखो बांधव येणार आहेत. त्यांची कसलीही गैरसोय होणार नाही, याची आयोजक काळजी घेत आहेत. दरम्यान बीड जिल्ह्यातील मुस्लीम बांधवांच्या दृष्टीकोनातुन अतिशय महत्वाचा इज्तेमा सारखा धार्मीक कार्यक्रम अंबाजोगाई ता.अंबाजोगाई येथे होत आहे. या धार्मीक कार्यक्रमाला बीड जिल्ह्यासह इतर जिल्हयातून मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत, सदरील वाहनांना टोल माफी देण्यात यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी पाडळशिंगी येथील आयआरबीचे व्यवस्थापक, हुले कन्सट्रक्शन टोलप्लाझा, सेलुअंबा, आस्मी रोड वैद्यकिन्ही टोल प्लाझा (एच.पि.एम.टोल प्लाझा) वैद्यकिन्ही, ता.पाटोदा यांना पाठविले आहे.

## तांबाराजुरी जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांनी अनुभवला आठवडी बाजार कोणी विकले पोहे;तर कोणी विकले दही धपाटे

पाटोदा: प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबाराजुरी मध्ये बुधवार (दि.१) रोजी कोणी वडापाव, शाबू वडे, पोहे विकले,कोणी दही धपाटे विकले तर कोणी आपल्या शेतातील भाजीपाला विकून आठवडी बाजाराचा अनुभव घेतला.विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने यंदाही जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा तांबा राजुरी आयोजित आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले. या बाजारात जवळ - जवळ बारा ते पंधरा हजारापर्यंत उलाढाल झाली.७८ विद्यार्थी संख्या असलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबाराजुरी शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी या बाजाराचे नियंत्रण के-ले.मुलांनी आपल्या शेतातून आणलेला भाजी-पाला कांदे,बटाटे ,कोथिंबीर, टोमॅटो, भेंडी, गवार, लसूण, पेरू, लिंबू, केळी यासह खाद्यपदार्थांमध्ये दही धपाटे, शाबु वडे, वडापाव, मसाला पापड, पोहे, भजे,बिस्किट, चॉकलेट, चिक्की आदी पदार्थ विद्यार्थ्यांनी बाज-ारात विक्रीसाठी ठेवले होते.बाजारा-तून गावातील महिला व पुरुष, पालक, ग्रामस्थ यांनी आवर्जून लहान मुलांकडून खरेदी केली.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री बबन पवार सर, केशव तांबे, विकास तांबे ग्रा पं



सदस्य, विलास तांबे, धनंजय तांबे, विकास तांबे, दत्ता तांबे, जयदत्त तांबे, का-का घालमीले, माऊली नेमाने आदी ग्रामस्थांनी बाजाराला भेट देऊन मुलांचे कौतुक करून खरेदी केली. तसेच महिलांची उपस्थिती विशेष होती, सर्व महिल-ांनी चिमुकल्यांकडून खरेदी केली.यावेळी बोलताना मुख्याध्यापक सोंडगे सर म्हणाले की, विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी शिक्षकांच्या संकल्पनेतून आठवडी बाजार उपक्रम राबविण्यात आला. यातून विद्यार्थ्यांना खरोखरच खूप काही शिकायला मिळते. सोबतच गणित विषयाशी निगडित अन्य व्यावहारिक ज्ञानही त्यांना मिळते.शाळेमध्ये विविध उपक्रम आम्ही नेहमीच राबवत असतो,यापुढेही राबवले जातील असे मुख्याध्यापक सोंडगे सर यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी तांदळे सर, अनिकेत तांबे सर, गाडेकर मॅडम,राठी मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# वाल्मिक कराड ताब्यात असलेल्या शहर पोलीस ठाण्यात येणाराची करून चौकशी




मस्साजोग सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी दिवसाढवळ्या अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली होती.या हत्या मागील कारण खंडणीची असल्याचे उघड झाल्याने वाल्मीक कराड सह इतरावर अवादा पवनचक्की कंपनी अधिकाऱ्यांनी केज पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्यापासून वाल्मीक कराड सह इतर आरोपी २० दिवस फरार होते. परंतु वाल्मीक कराड पुणे येथे सीआयडीला शरण आला होता. त्याला केज न्यायालया समोर रात्री उशिरा हजर करण्यात आले यावेळी दोन्ही पुढील वकिलांचा युक्तिवाद होऊन १४ दिवसाची सीआयडी कोठडी सुनावण्यात आली.

केज न्यायालय व रुग्णालय परिसरात वाल्मीक कराड च्या समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. वाल्मीक कराड हे सध्या चौकशीसाठी बीड शहर पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आल्यामुळे याठिकाणी पोलिसांकडून विशेष खबरदारी बाळगली जात आहे. यामुळे बीड शहर पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे नाव आणि येण्याचे कारण नोंदवून घेतले जात आहे. तसेच कुणाकडे काम आहे? कोणत्या अधिकाऱ्याला भेटायचे आहे? त्याची नोंद रजिस्टर वर घेतली जात आहे. हा डेटा दररोज सीआयडी आणि पोलीस अधीक्षकांकडे पाठवण्यात येणार आहे. वाल्मिक कराडच्या चौकशीतून सीआयडीच्या हाती कोणती माहिती लागणार, याकडे सर्वांच्या नजरा आहेत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ३ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

## आजचे राजकारण

- विनाकारण नाहक वंजारी समाजाला बदनाम करण्याचा डाव काही विघ्नसंतोषी राजकीय पुढा-ंनी जो मांडला आहे त्यांना मला एक सांगायचे की क्रूरतेला कोणतीही जात नसते स्व. संतोष देशमुख यांचा खून ज्या पद्धतीने झाला ते पाहता प्रत्येक माणसाचं मन हेलावून गेलेलं आहे हे कोणालाही पटलेलं नाही त्यामुळे विनाकारण जिल्ह्यातील वातावरण दोन समाजात बिघडवण्याचा आपण प्रयत्न करू नये कारण तुम्ही प्रतिनिधी आहात प्रतिनिधी हा सर्वसम ावेशक भूमिका घेत असतो मात्र इथं असं होताना दिसत नाही...मूक मोर्चात स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांचे कुटुंबीय हजर असताना त्यांच्या न्यायासाठी जो मोर्चा काढला गेला त्यामध्ये जे काही घडलं ते इथल्या पुरोगामी विचाराच्या जिल्ह्यातील प्रत्येक माणसाने पाहिलं टाळ्या, शिट्ट्या, शेरोशायरी असे बीभत्स प्रदर्शन या मंडळींनी या ठिकाणी मांडलं हे कितपत योग्य आहे...स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांच्या मारेक-यांना फाशीची शिक्षा व्हावी या प्रमुख उद्देशाने निघालेला मोर्चा आणि त्यातील भाषणात आलेले मुद्दे हे फक्त मुंडे परिवारातील कोणीही सत्तेतनसावं या एकमेव आकसापोटी पुढारी एकत्र आल्याचे दर्शन सबंध जिल्ह्यातील जनतेने व महाराष्ट्राने पाहितल येत्या काळात ज्यांनी ज्यांनी कोणी अपराध केला त्यांना शिक्षा जरूर व्हावी मात्र बीड जिल्हा हा पुरोगामी विचाराचा जिल्हा म्हणून ख्याती असलेला आहे त्यावेळी आपण आपल्या म ातीला किती बदनाम करतोय याचा सुद्धा विचार इथल्या लोकप्रतिनिधींनी कळणे गरजेचे आहे. स्वर्गीय मुंडे साहेब यांच्या कारकिर्दीत सुद्धा त्यांना राजकीय जीवनातून संपवण्यासाठी विविध प्रकारचे कटकारस्थान रचले जायचे तेच आज नामदार धनंजय मुंडे साहेब व पंकजाताई यांच्या बाबतीत घडताना दिसत आहे. मस्साजोगची घटना ही निंदनीय आहे, मात्र या घडलेल्या घटनेच्या आडून काही मंडळी आपली राजकीय पोळी भाजण्याचा जो प्रयत्न करत आहे ते अशोभनीय आहे. इथून मागे कुठलीही जात-पात न पाहता हा जिल्हा गुन्ह्यागोविंदाने नांदला आहे , राहिला आहे. इथला प्रत्येक माणूस जातपात न पाहता एकमेकांच्या मदतीला सुखदुःखात धावलेला आहे हे आपण विसरून जाता कामा नये. राजकीय लालसे पोटी व राजकीय स्वार्थासाठी हे लोकप्रतिनिधी आपल्या स्वतःच्या मायभूमीला किती बदनाम करतायेत ही याचे दुःख कुठेतरी बीड जिल्ह्यातील जनतेला नक्कीच होत आहे.

## 5 जानेवरी रोजी बीड येथे पुरस्कार होणार प्रदान

केज/प्रतिनिधी केजचे भुमिपुत्र मौलाना आझाद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक अमजदोदिन मुमताजोदिन खतीब यांनी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. 5 जानेवरी रोजी बीड येथील डॉ. बाबासाहेब अंबेडकर भवन येथे पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अमजदोदिन मुम्ताजोदिन खतीब यांना बीड येथील सा.द. स्कुल एक्सप्रेस यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्या बद्दल आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला आहे. मुख्याध्यापक खतीब अमजदोदिन मुम्ताजोदिन यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर होताच मौलाना आझाद शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी आणि त्यांच्या मित्र परिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव करण्यात येत आहे.

# बीडच्या खाकीतला जातीयवाद दुर्दैवी!

आज महाराष्ट्र पोलीस स्थापना दिवस आहे. २ जानेवारी १९६१ रोजी महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना करण्यात आली. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते पोलीस दलाला ध्वज प्रदान करण्यात आला. तेव्हापासून २ जानेवारी हा महाराष्ट्र पोलीस स्थापना दिन दरवर्षी साजरा केला जातो. गेल्या ६० - ६५ वर्षात महाराष्ट्र पोलीस विभागाने केलेली प्रगती प्रशंसनीय अशी आहे. मुंबई पोलीस असो की क्राइम ब्रांच आणि वेगवेगळ्या त्यांच्या शाखा देशभरात कौतुकाचा विषय ठरलेल्या आहेत. महाराष्ट्र पोलिसाची तुलना थेट स्कॉटलंड पोलिसांशी केली जाते, ती उगाचच नाही. पण याच महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पोलिसांच्या डोक्यात जात घुसली असून, यामुळे ते इतरांची दखल ही घेत नसून, आपसातही जातीचा विचार करीत काम करीत आहेत. यामुळे ते सामाजात काय शांतता निर्माण करणार असा प्रश्न उपस्थित करीत बीडच्या खाकीतील वाढता जातीवाद दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. एवढ्या वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या पोलीस दलात अनेक बदल झाले, राजकीय हस्तक्षेप ते पोलिसांतील गुन्हेगारी याबाबत अनेक वेळा टीका होते, झाली आहे. मात्र अशा काही घटना झाल्या असल्या तरी महाराष्ट्र पोलीस हे स्वतःचे स्थान टिकवून आहेत, हे मान्य करावे लागते. खरंतर पोलीस सेवा हे एक व्रत असल्याने त्याचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी पोलिसांची असते. पोलीस हा स्वतःचा कधीच नसतो तर तो समाजाचा असतो मात्र ते स्थान टिकविण्याची जबाबदारी स्वतः पोलीसावर आलेली आहे. पोलिसांना ना कुठली जात असते ना कोणता धर्म असतो. ज्याला हे तत्व कळले आणि त्याचे अनुसरण जो करतो तो खरा पोलीस असतो. अलीकडे बीड जिल्ह्यामध्ये मात्र पोलीस खात्यामध्ये काही पोलिसांच्या डोक्यामध्ये जात गेली असल्याचे काही प्रकरणावरून दिसते आहे, जे जिल्ह्यासाठी हानिकारक आहे. तसे तर जिल्ह्यातील सध्याची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती राज्यभरात चर्चिली जात असून त्याचे खापर पोलिसांवरही फोडले जात आहे. जिल्ह्यात घडलेल्या घटना आणि गुन्हेगारीचे वाढते प्रमाण यामुळे जिल्ह्यातील पोलिसांची प्रतिमा डागाळली आहे. ही अशी परिस्थिती फक्त बीड जिल्ह्यातच झाली आहे असे नाही तर इतर जिल्ह्यातही कमी अधिक प्रमाणात असे होते. मात्र जिल्ह्याला पोलिसांच्या बाबतीत दुसरीच एक समस्या भेडसावताना दिसत आहे. ज्यांच्यावर सबंध समाजाच्या संरक्षणाची जबाबदारी आहे अशा काही पोलिसांच्या डोक्यामध्ये जातीचे किडे वळवळ करीत असल्याचे दिसून येत आहे. हा प्रकार गेल्या काही महिन्यामध्ये प्रकर्षाने वाढला आहे. मराठा आरक्षणाचा लढा आणि त्यानंतर झालेली लोकसभेची निवडणूक यामध्ये जिल्ह्यातील सामाजिक परिस्थिती प्रचंड ढवळून निघाली. मराठा- ओबीसी असा वाद जसा निर्माण झाला त्याचे परिणाम थेट प्रशासकीय पातळीवर सुद्धा झाले आहेत. त्यात अलिकडे संतोष देशमुख यांचा खून झाल्यानंतर या स्थितीला आणखी हवा मिळाली आहे. बीड पोलीस दलामध्ये दोन्ही समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. यामध्ये सगळे सारखे नाहीत हे खरे असले तरी अनेकांच्या डोक्यामध्ये मात्र जात गेली आहे. दुसऱ्या समाजाच्या लोकांची दखल न घेणे, आपल्याच खात्यात असलेल्या सहकाऱ्याला सहकार्य न करणे असे प्रकार घडत आहेत. काही ठिकाणी तर जाणून बुजून त्रास दिला जात आहे. पोलिसांमध्येच वाढत चाललेली ही जातीय विषमता जिल्ह्याला नुकसानदायी ठरणारी आहे. एकतर बीड जिल्हा मागास जिल्हा म्हणून ओळखला जातो, त्या अनुषंगाने राजकारण आणि राजकारणातून होत असलेली गुन्हेगारी हा चिंतेचा विषय आहे. या वाढत्या गुन्हेगारीमुळे आणि अवैध धंद्यामुळे तरुणांची पिढी बरबादीच्या उंबरठ्यावर गेली आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर, येणारी पिढी सुद्धा यामध्ये बरबटली जाणार आहे. ही रोखण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पोलिसांवर आहे. मात्र जर पोलिसांचे आपसातच जमत नसेल, एकमेकांचा द्वेष होत असेल तर ते ही वाईट परिस्थिती निपटून कशी काढणार ? पोलिसांची ही वृत्ती अशीच राहिली तर ते जिल्ह्यासाठी घातक ठरणारे आहे. गुन्हेगाराला जात धर्म नसतो हे साधे गणित पोलिसांनी लक्षात घेण्याची गरज आहे. पोलिसांचे जे ब्रीद वाक्य आहे, सद्रक्षणाय खलनिग्रहणाय याचा अर्थ असा की, महाराष्ट्र पोलीस सज्जनांचे रक्षण करण्यास आणि दुर्जनांवर नियंत्रण ठेवून त्यांचा नायनाट करण्यास कटिबध्द आहेत. या ब्रीद वाक्याचे काटेखोरपणे जर पालन केले तर पोलिसांची प्रतिमा मलिन होण्याचा प्रश्नच येत नाही.

# जात, धर्म,आणि संपत चाललेली माणुसकी माणसाची माणुसकी हिच जात

खरं तर लिंग, जात, धर्म, भाषा, देश हे काही आपल्याला, आपल्या चॉइसनुसार मिळालेले नसतात. तरीही ते माणसाच्या दुराभिमानाचे विषय बनतात. बनतात तर बनतात, पण या प्रत्येकाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी, माणसाने काहीना काही त्याग केला पाहिजे, असं त्याच्यावर सतत बिंबवलं जातं. ज्या गोष्टी आपल्याला, आपल्या पसंती वा मर्जीनुसार मिळाल्या नाहीत, त्यांचं आपल्यावर ऋण ते कसं? असा साधा विचारही आपल्या डोक्यात येत नाही.जातीचं ऋण फेडण्यासाठी तर, माणसाने माती खाल्ली पाहिजे, असं म्हटलं जातं. त्यावरुनच मजातीसाठी माती खाणेफ, हा वाक्प्रचार रुढ झाला. नुसता रुढ झाला नाही, तर मेंदूवर आरुढ झाला. खरंच जातीइतकी माती, माणसाची इतर कोणत्याही गोष्टीने केली नाही. जातीचं राजकीय मूल्य जितकं जास्त, तितकी माती खाणा-यांची संख्याही जास्त. अशी माती खाणारी माणसं पाहिली की मती गुंग होते.ज्याकाळी रोटीबेटी व्यवहाराची आणि व्यवसायाची, जातीय बंधनं काटेकोर होती. त्या काळात जातीसाठी माती खाणे समजू शकतो. पण आज व्यवसाय स्वातंत्र्यामुळे व्यवसायांचा जातीशी, तसा काटेकोर संबंध राहिला नाही. रोटीव्यवहाराचं बंधनही आता उरलं नाही. जातपंचायतींना मूठमाती मिळाली आहे. एक बेटीव्यवहारा पुरता काय तो, जातीशी व्यक्तीचा संबंध उरला आहे. आंतरजातीय विवाहांमुळे, जातींसंस्थेच्या त्या बुरुजालाही हादरे बसू लागले आहेत. अशाप्रकारे जातीची वाटचाल, मआयसीयूफच्या दिशेने सुरु आहे. पण तसतसा तिचा उमाळा मात्र वाढतो आहे, याचं नवल वाटतं. एकेकाळी श्रम- विभागणीसाठी अस्तित्वात आलेली जात, पुढे समाज-विभागणीचं प्रभावी साधन बनली. कलाकौशल्याच्या जपणुकीसाठीची ही व्यवस्था,माणुसकीला काळीमा फासणारी व्यवस्था ठरली. सेवासुविधा पुरविणारी जात, शोषणपीडणाचं साधन बनली. माणसामाणसात फूट पाडून, माणुसकीचहित्या करणारं भयंकर हत्यार बनली.प्रत्येक जातीत तीन प्रकारची माणसं असतात. एक हात देणारे, दोन हात दाखवणारे आणि तीन हात बांधून गंमत पाहणारे. या तीन प्रकारची माणसं नाहीत, अशी एक तरी जात आहे का? वास्तविक हे तीन प्रकार म्हणजेच माणसाच्या जाती होत. ज्या जातीत फक्त मदतीचा हात देणारीच माणसं आहेत, त्यांनी जरुर जातीचा अभिमान बाळगावा नि जातीसाठी माती खावी.प्रत्येक व्यक्तीने त्याच्या वैयक्तीक जीवनात जातीचं योगदान किती? याचा हिशेब मांडला, तर लक्षात येईल की, जीवनाच्या वेगवेगळ्या वळणांवर त्याला स्वजातीपेक्षा, अन्य जातींचंच योगदान सुभाषचंद्र सोनारअधिक लाभलं आहे. जरा आठवून पहा. आपल्या सुखदुःखात धाऊन येणारे सगळे जातीचे होते का? आपल्या जीवनाला कलाटणी देणा-या व्यक्ती जातीच्याच होत्या का? सख्ख्या भावापेक्षा ज्यांनी आपल्यावर जास्त प्रेम केलं, ते मित्र जातीचे होते का? बिकट प्रसंगी ज्यांनीमदतीचा हात दिला, ते जातीचे होते का? दुःखाच्या प्रसंगी जे सांत्वनासाठी आले, ते जातीचे होते का? आणि शुभप्रसंगी उपस्थित राहून, ज्यांनी आपल्या कार्याची शोभा वाढवली, ते सर्व जातीचे होते काय ?तात्पर्य हात देणारे सारे जसे, जातीचे नसतात. तसेच हात दाखवणारेही सारे, परजातीचे नसतात !समाजात वावरताना आपण भाजीवाला, किराणावाला, डॉक्टर, नर्स, ड्रायव्हर, प्लंबर, गवंडी, इलेक्ट्रीशियन इत्यादींना जात विचारतो का? या सर्वांची आपण जात पाहत नाही, तर गुणवत्ता पाहतो. जो गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करेल, त्याची आपण निवड करतो. जीवावर बेततं तेव्हा जीव वाचवणारं रक्त कोणाचं होतं, याची आपण चौकशी करतो का? रक्त जर कोणाचंही कोणाला चालतं, तर मग जातिभेद आणि धर्मभेदाला काय अर्थ उरतो? माणसाला माणसाचंच रक्त चालतं प्राण्यांचं चालत नाही. याचा अर्थ माणसाची माणूस हीच एक जात आणि माणूसकी हा एकच धर्म आहे.भगवान बुद्धांनी तीन हजार वर्षांपूर्वी सांगितले होते, मजाती प्राणी व वनस्पतीत आहेत. मनुष्यात जाती नाहीत.फ तरीही जातीला आपण उराशी कवटाळतो. याला काय म्हणणार? अहो! यालाच जातीवर जाणं किंवा जातीसाठी माती खाणं म्हणतात. तरीही तिला आपण उराशी कवटाळतो. याला काय म्हणणार? अहो! यालाच जातीवर जाणं किंवा जातीसाठी माती खाणं म्हणतात. खा बाबांनो! पसंद अपनी अपनी, खयाल अपना अपना !

**आशोक नागरगोजे**

# बर्दापुर हद्दीत अहमदपुर रोडवरुन येणारी अवैध चोरटी वाहतूक करणारी

## वाळुची हायवा ट्रक स्थानिक गुन्हे शाखेने पकडला

पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी जिल्हयातील अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस निरीक्षक उस्मान शेख, स्था.गु.शा.बीड यांना आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी व अंमलदार यांना अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. दिनांक ३१/१२/२०२४ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि सुशांत सुतळे व त्यांचे पथक बर्दापुर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना स्थागुशा पथकास गोपनिय माहिती मिळाली की, अहमदपुर रोडने उजनी गाव ता.अंबाजोगाई चे दिशेने विनानंबरच्या टाटा हायवा मध्ये अवैध गौणखनीज वाळु विक्री करण्यासाठी चोरटी वाहतूक करीत आहे अशी खात्री लायक बातमी मिळताच सदर माहिती पो.नि. उस्मान शेख स्थागुशा बीड यांना कळविली व त्यांनी छापा कारवाई करण्याचे आदेश दिल्याने स्थागुशा पथकाने उजनी फाटा येथे रात्री अकरा वाजता हायवा थांबवला असता त्यात अवैध वाळु



घेवुन जातांना आरोपी १) मारोती तुळशिराम केंद्रे वय ४९ रा.दराडवाडी ता.अंबाजोगाई व हायवा मालक रामकृष्ण दिवाकर चाटे वय ३५ रा.चाटेवाडी ता.अहमदपुर जि.लातुर हे मिळुन आले व त्यांचे ताब्यातुन एक वाळुने भरलेली हायवा कि.अं. २०,००,०००/- व त्यामध्ये असलेली ०५ ब्रास वाळु कि.अं. २५०००/- असा एकुण २०,२५,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोह/विकास राठोड स्थागुशा बीड यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्याद वरुन पो.स्टे.बर्दापुर येथे दोन आरोपी विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारावाई ही नवनीत कॉंवत पोलीस अधिक्षक,बीड, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक,बीड, पोलीस निरिक्षक उस्मान शेख, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, पोह/मारुती कांबळे, विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, विष्णु सानप, पोशि/ सचिन आंधळे, चापोह/ वडमारे यांनी मिळुन केलेली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ३ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटनेच्या वतीने शालेय शिक्षण विभागीय आयुक्त यांचा नविन वर्ष निमित्त सत्कार



–पुणे/प्रतिनिधी: –महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटना समन्वय समितीच्या महिला राज्याध्यक्ष आदरणीय सुदर्शनाताई शिक्षक संघटनेचे समन्वयक प्रकाश घोळवे ,सोलापूर भूषण संपादक आदरणीय विष्णू कारंपुरे महाराज व संघटनेचे विविध पदाधिकारी यांनी नुकतेच पुणे येथे रुजू झालेले विभागीय शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग साहेब यांचा सत्कार शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला आपण शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या अनेक अडीअडचणी सोडविताल शिक्षकांना न्याय देताल असे मनोगत आदरणीय सुदर्शनाताईनी व्यक्त केले त्यांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या .

## मकृत्रिम बुद्धीमत्तेचाफउपयोग करून मंत्रालयातील सुरक्षा भक्कम करावी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्र्यांनी घेतला मंत्रालय सुरक्षेचा आढावा

मुंबई, दि. २ : राज्याच्या काना– कोप–यातून आपल्या कामाच्या पुर्ततेसाठी नागरीक मंत्रालयात येत असतात. त्यामुळे मंत्रालयामध्ये भेट देणा–या नागरिकांची संख्या वाढत असते. परिणामी, मंत्रालयातील सुरक्षा यंत्रणेवर ताण पडतो. मंत्रालयात येणारे नागरिक, येथील अधिकारी व कर्मचारीवृंद यांना विनासायास, सुलभ प्रवेश मिळावा आणि सुरक्षा पण भक्कम रहावी, यासाठी कृत्रिम बुद्धमतेचा उपयोग करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. मंत्रालयात आज आयोजित बैठकीत मंत्रालय सुरक्षा व्यवस्थेचा आढावा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी घेतला. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. इक्बालसिंग चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते.

कृत्रिम बुद्धीमत्तेच्या सारख्या आधुनिक तंत्रज्ञानातून मंत्रालय प्रवेश ते बाहेर पडेपर्यंतची व्यवस्था कार्यरत करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मंत्रालयातून विधान भवनात कार्यालयीन कामकाजासाठी अधिकारी व कर्मचारी जात असतात. अधिवेशनादरम्यान तर विधान भवन ते मंत्रालय वर्दळ वाढलेली असते. विधान भवनात नियमित कार्यालयीन कामासाठी जात असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांना सर्व ठिकाणी प्रवेश असलेल्या सुरक्षा पासेस देण्यात याव्यात. मंत्रालय ते विधान भवन भुयारी मार्गाचे काम सुरू आहे. या भुयारी मार्गामध्ये विधान भवनात जाणा–या अधिकारी व कर्मचा–यांच्या प्रवेश मार्ग उपलब्ध करून द्यावा.

मंत्रालयात प्रत्येक मजल्यावर सुरक्षा जाळीचे काम पूर्ण करावे. काम पूर्ण झाल्यास मध्ये लावलेली सुरक्षा जाळे काढून टाकावे. मंत्रालय प्रवेशद्वारावर सामानाची चोख तपासणी करण्यात यावी. कुठलीही आक्षेपार्ह वस्तू मंत्रालयात येणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

******

# मस्साजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनप्रकरणी चौकशीसाठी आयपीएस अधिकारी डॉ .बस्वराज तेली यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी

बीड / (प्रतिनिधी):– बीडजिल्ह्यामधील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात अखेर एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. आयपीएस अधिकारी बसवराज तेली यांच्या नेतृत्वात १० जणांची टीम या प्रकरणात सखोल तपास करणार आहे. एसआयटीच्या स्थापनेनंतर या प्रकरणाच्या तपासाला अधिक वेग मिळण्याची शक्यता आहे.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला तीन आठवडे उलटल्यानंतरही तीन आरोपी अजूनही फरार आहेत. तसंच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा हत्येच्या गुन्ह्यातही सहभागी असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे कराडचा या प्रकरणात सहभाग होता का आणि असेल तर तो कशा स्वरुपात होता, हे स्पष्ट होण्यासाठी हत्या प्रकरणाची सखोल चौकशी होणं गरजेचं आहे. या अनुषंगाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान एसआयटीची घोषणा केली होती.सन २010 च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले डॉ. तेली हे एमबीबीएस



असून ते मूळचे बेळगाव जिल्ह्यातील रायबाग तालुक्यातील खंदीबुद या गावातील आहेत. पोलीस दलातील त्यांच्या सेवेस पाचोरा (जि. जळगाव) येथून झाली. त्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून, पुणे येथे शहर उपायुक्त म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी वर्धा येथे पोलीस अधीक्षक म्हणून काम केल्यानंतर नागपूर शहर पोलीस उपायुक्त म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे, एसआयटीच्या टीममध्ये कोणाकोणाचा समावेश?

आयपीएस अधिकारी डॉ. बसवराज तेली पोलीस उपमहानिरीक्षक –अनिल गुजर पो. उप अधीक्षक –विजयसिंग शिवलाल जोनवाल स.पो. निरीक्षक महेश विघ्ने पो.उ. निरीक्षक आनंद –शंकर शिंदे – पो.उ. निरीक्षक तुळशीराम जगताप – सहा. पो. उ. निरीक्षक मनोज राजेंद्र वाघ – पोलीस हवालदार/१३ चंद्रकांत एस. काळकुटे – पोलीस नाईक / १८२६ बाळासाहेब देविदास अहंकारे पोलीस नाईक /१६७३ संतोष भगवानराव गित्ते पोलीस शिपाई/४७१ –

# जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०१९–२० साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड दि. २ :– क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अतंर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे / योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे २०१९–२० करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम, २०१७ नुसार जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत खेळाडू ( ०१ पुरूष ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू ) व ०१ गुणवंत क्रीडा कार्यकर्ता असे एकुण ०५ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सन २०१९–२० च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दिनांक ०१ जुलै २०१८ ते ३० जून २०१९ या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

गुणवंत खेळाडू

१. खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व ०५ ( पाच ) वर्षापैकी ०२ ( दोन ) वर्षे त्या जिल्हयाचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे.

२. खेळाडूंची मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत राज्य / राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमधील पुरस्कार वर्षांच्या लगतपूर्व ०५ ( पाच ) वर्षातील राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वरिष्ठ / कनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा, शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल व यापैकी उत्कृष्ट ठरणाज्या ०३ ( तीन ) वर्षाच्या कामगिरीचा विचार गुणांकण कोष्ठकामध्ये करण्यात येईल.

३. खेळाडूने स्पर्धांच्या मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सोबत सादर करणे आवश्यक राहील.

४. खेळाडूंचा अर्ज अधिकृत जिल्हा संघटने मार्फत सिफारस करून सादर करून आवश्यक राहील तथापि अपवादात्मक परिस्थीतीत खेळाडू वैयक्तीकरित्या अर्ज सादर करू शकतील.

५. एशियन गेम्सब, कॉमनवेल्थ गेम्सब, जागतीक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा ( सर्व गट ), जागतीक चषक क्रीडा स्पर्धा ( सर्व गट ), आशियाई अजिंक्यपद स्पर्धा ( सर्व गट ), राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा ( सर्व गट ), युथ ऑलिंपीक गेम्सब, युथ कॉमनवेल्थ गेम्सब, युथ जागतिक आजिंक्यपद / युथ जागतिक चषक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत सहभागी खेळाडूस २०१९–२० करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार थेट देण्यात येईल.

गुणवंत क्रीडा मार्गदर्शक

१. क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्र राज्यात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असले पाहिजे व त्याने पुरस्कार वितरीत करण्यात येणा–या सन २०१९–२० वर्षात वयाची ३० वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

२. क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरीष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला ( खेलो इंडिया ) मधील राज्य ते राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदकविजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील.

३. सांघिक अथवा वैयक्तीक मान्यता प्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल खेळाडू अथवा राज्य / जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक पात्र असेल.

क) गुणवंत क्रीडा संघटक / कार्यकर्ता :–क्रीडा संघटक / कार्यकर्त्याने सतत १० ( दहा ) वर्षे महाराष्ट्रात क्रीडा विकासासाठी भरीव योगदान दिलेले असावे व त्याने वयाची ३० वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. गुणांकनांकरिता बीड जिल्ह्यातील कामगिरी ग्राह्य धरली जाईल.

१) विकासात्मक कार्य :– संघटक / कार्यकर्ते यांच्या सक्रीय प्रयत्नातून बीड जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या अधिकृत खेळांची मैदाने, व्यायामशाळा, क्रीडा संस्था, संघटना स्थापन करणे तसेच राष्ट्रीय, राज्य, विभागीय, जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा भरविणे व अर्जदाराची त्यात कोणती जबाबदारी होती हे पुराव्यासह यादी सादर करावी लागेल.

२) संघटनात्मक कार्य :– दि.३० जून २०१९ पूर्वी लगतपूर्व १० वर्षात किती अधिकृत खेळाच्या एकविध जिल्हा व राज्यस्तरीय संघटनेवर पदाधिकारी आहेत, त्या पदांची जबाबदारी व केलेल्या कामाची माहिती व कार्यरत असलेल्या संघटनेत लगतपूर्व १० वर्षात किती खेळाडूंनी जिल्हा / राज्य / राष्ट्रीय पातळीवर पदके संपादन केली अशा खेळाडूंची संबधित खेळाच्या संघटनेच्या अध्यक्ष / सचिव यांच्या स्वाक्षरीसह यादी. राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय खुल्या गटाच्या अजिंक्यपद स्पर्धांच्या निवड समितीचे सदस्य / पंच / सामनाधिकारी / वेळाधिकारी / गुणलेखक व व्यवस्थापक म्हणून केलेल्या कामगिरीचे प्रमाणपत्रे साक्षांकीत प्रतीसह सादर करावीत.

३) क्रीडा प्रचार व प्रसार :– क्रीडा विषयक लिखाण , वक्तव्य, संशोधनात्मक कार्य, क्रीडा परिसंवाद, चर्चासत्राचे आयोजन, प्रात्यक्षिके, चित्रपट, प्रदर्शन इ. माध्यमातून प्रसारीत केलेले कार्य व क्रीडा विषयक स्वतंत्र लिखाण / पुस्तके / मासिके / साप्ताहिके अथवा दैनिके यातील क्रीडा विकास विषयक लेख ( समालोचनात्मक नव्हे ) आकाशवाणी अथवा दूरदर्श अथवा अन्यत्र केलेले भाषण , क्रीडा विषयक चर्चासत्रे आणि परिसंवादाचे आयोजन किंवा सहभाग याही बाबी पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जातील.

विहित नमुण्यातील अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आला आहे. बीड जिल्हयातील पात्र असलेल्या क्रीडापटुंनी उपरोक्त पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज दि. १० जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, मो.९६०४९५९६७८ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# राष्ट्रसंत भगवानबाबाच्या प्रतिमेची विटंबना करणा–यावर तात्काळ कारवाई करा पाटोद्यात निषेध व्यक्त करत केली कारवाईची मागणी



पाटोदा /प्रतिनिधी:–समाजाला माणुसकीची शिकवण देणारे थोर समाजसुधारक राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या प्रतीमेची केज तालुक्यातील सातेफळ येथे विटंबना करण्यात आली असून या घटनेचा सर्व स्तरातुन निषेध व्यक्त होत असून या घटनेसंदर्भात संत भगवानबाबा यांच्या भक्तांनी पाटोदा पोलीस निरीक्षक जाधव साहेब यांना निवेदन सादर करत कारवाईची मागणी करण्यात आली दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काल रात्री काही अज्ञात गुंडा कडून राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या नावाने असलेल्या चौकातील बाबांच्या फोटो ची विटंबना करून जाणून बुजून जातीय तेढ निर्माण करण्यासाठी होत असुन सदरील घटनेमुळे मोठा जातीय तेढ निर्माण होऊ शकतो तसेच संत भगवान बाबा यांच्या भक्ताच्या भावना दुखावल्या आहेत. तसेच सार्वजनिक शांतता भंग झाली आहे. समाजकंटकावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली तसेच सोशल मीडियावर फेक अकाउंट च्या करण्याचा प्रयत्न करण्यात येत असून अशा अकाऊंटवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली यावेळी पाटोदा तालुक्यातील संत भगवान बाबा यांचे भक्त मोठ्या संख्येने

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियानासाठी जास्तीत जास्त विभागांनी प्रस्ताव सादर करावेत –उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी

बीड दि. २ :-कार्यालयाने केलेल्या कामाचे मुल्यमापन होण्यासाठी व नाविन्यतापूर्ण अभियान राबविल्याचा गौरव होण्यासाठी शासनाने आपल्यास राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानातुन संधी उपलब्ध करुन दिली असून या अभियानातून बक्षिस प्राप्त होण्यासाठी जास्तीत जास्त कार्यालयाने राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धे साठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेश सुर्यवंशी यांनी आज राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान बैठकी प्रसंगी केले.शासन दरबारी काम करत असतांना आपल्या कोणत्याच कामाची शासनस्तरावर दखल घेतली जात नाही असा आपला सूर असतो आपल्या बुध्दी कौशल्यातुन विविध प्रकारे कार्यालयीन कामात केलेला बदल,कामाची गतिमानता, कार्यालयाचे सुशोभिकरण, कार्यालयाची अभिमुखता यातुन आपण केलेल्या कामाचा ठसा उपटविण्यासाठी शासनाने आपणस हे अभियान उपलब्ध करुन दिले असल्याचे श्री सुयंवंशी यांनी या प्रसंगी उपस्थित अधिकारी , कर्मचारी यांना सुचित केले.

या बैठकीस तहसीलदार तेजस्विनी जाधव, होत डीवायएसपी उमाकांत दस्तुर विविध कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

तहसीलदार तेजस्विनी जाधव यांनी प्रस्ताविकात अभियान व स्पर्धे शी संबधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून या पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक ािरसरींळरलहळूरप.ारहरीरीहींीर.र्सेी.ळप या लिंकवर ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत तसेच दि. ३/२/२०२१ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या स्पधेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दि. १६ ते ३१ ऑक्टोबर २०२४ होती. या कालावधीत वाढ करुन दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ दिली आहे.



स्पर्धेत सहभाग घेण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी राज्यस्तरावर त्याचप्रमाणे विभागीय,महानगरपालिका व तालुका स्तरावर स्पर्धेचे अर्ज परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन (जछछङखछए) पध्दतीने भरावेत. या प्रस्तावावर शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.

रविवार दि. ५ जानेवारी २०२५ रोजी आवक जावक शाखा सुरु ठेवण्यात आलेली असून ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यात तांत्रिक अडचण येत असेल तर आवक जावक विभागात सकाळी ११ ते दुपारी १. ०० पर्यंत संपर्क साधावा किंवा विनायक भावसार यांच्याशी संपर्क साधून तांत्रिक अडचण दूर करावी. त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९०४९००११०११ यावर संपर्क साधावा. प्रस्ताव सादर करण्याचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

कार्यालयीन व्यवस्थापननामध्ये आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब.सेवांची गुणवत्ता, दर्जा यामधील वाढ व उपक्रमांची परिणामकारकता. लोकभिमुख्ता. ई गव्हर्नस, संसाधनांचा पर्याप्त व प्रभावी वापर. तंटा, तक्रार मुक्त कार्यालय आणि नाविण्यपूर्ण व पथदर्शी स्वरंपाच्या संकल्पना/ प्रयोग उपक्रम.

अ) राज्यस्तरावरील प्रशासकीय कार्यालये तसेच इतर सर्व प्रकारांतील कार्यालयांच्या मुख्यालयांचे प्रस्ताव थेट राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करण्यात येतील. राज्यस्तरीय निवड समितीव्दारे थेट प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून तीन प्रस्तावांची निवड राज्यस्तरावरच्या पारितोषिकांसाठी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी करण्यात येईल.

ब) त्याचप्रमाणे, राज्यस्तरीय निवड समितीकडून दुस-या स्त्रोतातून प्राप्त झालेल्या म्हणजे विभागीय निवड समित्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून तीन प्रस्तावांची निवड अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी करण्यात येईल.

क) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग या तिस-या स्रोताकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी मंत्रालयांसाठी केलेल्या निकषांच्या आधारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी प्रस्तावांची निवड करण्यात येईल.

ड) प्रत्येक महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त दोन प्रस्ताव राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करण्यात येतील. त्यापैकी राज्यस्तरीय निवड समितीव्दारे पारितोषिकांसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी प्रस्तावांची निवड करण्यात येईल. अशा प्रकारे राज्यस्तरावर एकूण बारा पारितोषिकांचा विचार करण्यात येईल,

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ३ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## निर्भीड पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

### जिल्हा कार्याध्यक्षपदी सोळंके तर माजलगाव तालुका अध्यक्षपदी आडागळे यांची निवड -



माजलगाव (प्रतिनिधी) निर्भीड पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठकीचे शासकीय विश्रामगृह बीड येथे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वांनुमते जिल्हा व माजलगाव येथील पदाधिका–यांची निवड करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षपदी जिल्हाध्यक्ष देवेंद्र ढाका तर जिल्हासचिव आनंद वीर मार्गदर्शक समीर काझी व महिला जिल्हाध्यक्ष किरण डोळस यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये जिल्हा कार्याध्यक्षपदी परमेश्वर सोळंके व जिल्हा उपाध्यक्षपदी अमर साळवे यांची निवड करण्यात आली. तसेच माजलगाव तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब आडागळे उपाध्यक्षपदी शेख हमीद, सचिव राजरत्न डोंगरे सहसचिव सिद्धेश्वर गायकवाड, माजलगाव तालुका कार्याध्यक्षपदी संतोष रासवे तर मार्गदर्शक म्हणून प्रचंड सोळंके यांची निवड करण्यात आली. संघटक पदाची जबाबदारी विजय कापसे तर सहसंघटक पदी विजय डावरे तसेच प्रसिद्धीप्रमुख अनिकेत भिले गावकर सह प्रसिद्ध प्रमुख दिगंबर गिरी, तर सदस्य पदी मुंजाभाऊ गाडेकर, गणेश तोर, लखन यादव, शेख लतीफ, दत्ता जाधव, प्रवीण आडागळे, तेजस शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी सर्व निवड झालेल्या पदाधिका–यांचा पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले.

# तर मुख्यमंत्र्यांना राज्यात फिरु देणार नाही, मराठा आरक्षणा वरुन जरांगे पाटलांचा इशारा

## मराठा आरक्षण बैठकीदरम्यान उपोषणासंबंधित निर्णय घेतला

**बीड,/प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या लढाईसाठी एल्गार पुकारला आहे. २५ जानेवारीपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण करण्याची घोषणा त्यांनी केली आहे. राज्यभरातील मराठा समाजाने एकत्र येऊन उपोषणाला पाठिंबा द्यावा असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले आहे. मराठा आरक्षण बैठकीदरम्यान उपोषणासंबंधित निर्णय घेण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांनी पूर्वी जे सरकार होतं, आता पण तेच सरकार आहे. पूर्वी टोलवाटोल होत होती. पण आता देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे आता फडवणीस यांना



आरक्षण देण्यासाठी कोणीही अडथळा आणणार नाही. ते २५ जानेवारीला मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावतील. जर त्यांच्या मनामध्ये मराठ्यांविषयी द्वेष असेल तर ते मराठा आरक्षणाचा विषय मार्गी काढणार नाहीत, असे विधान केले आहे. ममराठा समाजाला आरक्षण मिळणार नसेल, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यात फिरु देणार नाह, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. नांदेडच्या मराठा आरक्षण संवाद बैठकीमध्ये त्यांनी हे विधान केले आहे. २५ जानेवारीला ते आरक्षणासाठी आमरण उपोषणाला बसणार आहेत. या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन मराठा समाजाला केले आहे. नांदेडच्या लोहा येथे मराठा आरक्षण संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी समस्त मराठा समाजाला उपोषणाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले. आपल्याकडे जे वाहन मिळेल, त्या वाहनाने २५ जानेवारी रोजी अंतरवाली सराटीला या. आपल्या समाजातील लेकरासाठी एक दिवस काम सोडून आंदोलनासाठी या, असे म्हणत जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला संबोधले.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा व सामुहिक वाचन कार्यक्रम संपन्न.

केज/ प्रतिनिधी सानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड येथे दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी ङ्क वाचन कौशल्य कार्यशाळा व सामुहिक वाचन असे दोन कार्यक्रम आज घेण्यात आले.सर्व प्रथम सामुहिक वाचन घेण्यात आले. युवक वाचक व जेष्ठ नागरीक यांचे सामुहिक वाचन झाले.त्यानंतर शालेय विद्यार्थी – विद्यार्थीनींचे सामुहिक वाचन पार पडले.विद्यार्थी – विद्यार्थीनीं साठी घेण्यात आलेल्या सामुहिक वाचनात यश भोगजकर, कल्याणी घोगले, पृथ्वीराज घोगले, कृष्णराजे गायकवाड, यश जोगदंड, दिव्या साबळे, स्वरा गायकवाड, मयुरी गायकवाड यांच्या सह अनेक विद्यार्थी – विद्यार्थीनी सामहिक वाचन आपआप आपल्या आवडीच्या पुस्तकाचे केले.त्यानंतर युवक व जेष्ठ नागरिकांनीही सहभागी होऊन आवडीच्या पुस्तकाचे सामुहिक वाचन केले.यात रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, आनंद गायकवाड, आरुण गायकवाड, नारायण गायकवाड, बब्रुवान गायकवाड, दादासाहेब गायकवाड, शिवाजी गायकवार,रामकृष्ण( तात्या) गायकवाड, रामराव गायकवाड, भतेरीनाथ पोळ, सुधीर गायकवाड, प्रकाश गायकवाड, बालासाहेब वैरागे, बन्सीनाना गायकवाड, रविंद्र गायकवाड



( पेंटर), रंजीत पाटील, एस. के. वैरागे, छगननाना गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांलासह अनेक युवक, जेष्ठ नागरिक यांनी सामुहिक वाचन केले. त्यानंतर वाचन कौशल्य कार्यशाळाङ्क घेण्यात आली.या कार्यशाळेत माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ सम ाजसेवक, वसुदेव ( बप्पा) गायकवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगननना गायकवाड यांनी सखोल वाचन कौशल्य कार्यशाळेत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत विधार्थी – विद्यार्थीनी, वाचक, युवक, जेष्ठ नागरीक यांची उपस्थिती होती.या वेळी रंजीत पाटील, रविंद्र गायकवाड (पेंटर), एस. के. वेरो, मयुरी गायकवाड, यांनीही मागदर्शन केले. सलग चाललेल्या ग्रंथप्रदर्शनालाही लहाण मचलांचा सर्वोत्तम प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी बन्सीनाना गायकवाड हे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन आनंद गायकवाड यांनी केले.

# डॉ.हनुमंत सौदागर मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



केज/प्रतिनिधी तालुक्यातील आनंदगाव येथील भूमिपुत्र डॉ.हनुमंत सौदागर यांना मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्काराने तुळजापूर येथे मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. महाविद्यालयत्तर उपक्रम पर्यावरण संवर्धन, जल साक्षरता, स्वच्छता अभियान, उपेक्षित विद्यार्थ्यांना शिक्षण कृतिशील उपक्रम अशा विविध कामाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्यास जि.प.धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गायकवाड,इतिहास अभ्यासक डॉ.श्रीमंत कोकाटे, तुळजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अम ोल ताकभाते,संयोजन समितीचे राजकुमार धुरगुडे,महेंद्र धुरगुडे, आदी म ान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्वातंत्र्य सेनानी भानुदासराव धूरगुडे यांच्या जयंतीनिमित्त मराठवाडा समन्वय समिती पुणे यांच्या वतीने उल्लेखनीय कार्य करण–या शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा हा प्रतिष्ठेचा मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार तुळजापूर येथे देऊन गौरविण्यात आले.



## पुरोगामी पत्रकार संघाच्या राज्य सचिव पदी दत्तात्रय मुजमुले यांची निवड

केज/प्रतनिधी :–राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची नवीन वर्ष २०२५ ची राज्य कार्यकारणी संस्थापक अध्यक्ष विजय सुर्यवंशी यांनी जाहीर केली. त्यात केज तालुक्याचे भूमिपुत्र पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांची राज्य सचिव पदी निवड करण्यात आली आहे.राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या आदेशानुसार दैनिक प्रभासकेसरीचे कार्यकारी संपादक तथा स्टार २४ न्यूज चॅनेलचे संपादक दत्तात्रय मुजमुले यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या राज्य सचिव पदी पदी निवड करण्यात आली आहे. पुरोगामी पत्रकार संघात मुजमुले यांनी सन २०१८ पासून संघात तालुका उपाध्यक्ष पदापासून काम सुरू केले होते. सन २०१९–२० साली तालुकाध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. त्यानंतर त्यांनी बीड जिल्हा प्रसिध्दी प्रमुख जबाबदारी पार पाडली होती. तर मागील वर्षी २०२४ साली बीड जिल्हाध्यक्ष म्हणून आणि प्रभारी राज्य प्रसिध्दी प्रमुख म्हणून ते कार्यरत होते. पुरोगामी पत्रकार संघात काम करत असताना दिव्यांग सेवा समिती, कला क्रीडा विश्व समितीचीही शाखा तयार केल्या आहेत. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात संघाची शाखा त्यांनी तयार केलेल्या आहेत. पुरोगामी पत्रकार संघात आजवर विविध पदावर केलेल्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल मित्रपरिवार, पत्रकार बांधव यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन करण्रसव होळे आहे,

## इज्तेमासाठी अंबाजोगाई बस फेऱ्या वाढविण्याची मागणी

## आज अन् उद्या दोन दिवस रहाणार सुरू



भारतातील हजारोंच्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थिती लावतात. येथे माणसाला माणूस म्हणून जगण्याचे तसेच धार्मिक जागृतीची शिकवणी दिली जाते. तर येथे अनेक विवाह पार पडतात. यामुळे हा सामाजाला चांगली शिकवण देणारा मेळावा ठरतो. शुक्रवारी सायंकाळी जगाच्या शांतता व प्रगतीची दुवा करुन याची सांगता होणार आहे. या इज्तेमाच्या पार्श्वभूमीवर बीड सह विविध आगारातून अंबाजोगाई मार्गावर धावणाऱ्या बसच्या फेऱ्या वाढविण्यात यावीत अशी मागणी करण्यात येत आह

मुस्लीम बांधवांचा धार्मिक इज्तेमा गुरुवार आणि शुक्रवार असे दोन दिवस असून, आजपासून सुरुवात झाली आहे. यामुळे अंबाजोगाई मार्गावर राज्य परिवहन महामंडळाने बसच्या फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी करण्यात येत आहे. प्रत्येक वर्षी घेण्यात येणार बीड जिल्हास्तरीय इज्तेमा अंबाजोगाई येथे आज गुरुवार (दि.२) व शुक्रवारी (दि.३) पार पडणार आहे. यासाठी जिल्हा

# शरद पवार-अजितदादा एकत्र आले पाहिजेत!

विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड यश आणि बहुमत मिळाले असले तरी मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटप आणि पालकमंत्रीपदावरून सारे काही आलबेल नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. महायुतीमधील काही मंत्र्यांनी अद्यापपर्यंत मंत्रिपदाचा पदभार स्वीकारलेला नसल्याचे म्हटले जात आहे. यावरून हे मंत्री नाराज आहेत का, अशा चर्चाही रंगल्या आहेत. यातच अन्न व औषध प्रशासनाचा कार्यभार दिलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मंत्रिपदाचा पदभार स्वीकारला आहे. यानंतर बोलताना नरहरी झिरवाळ यांनी अजित पवार आणि शरद पवार पुन्हा एकत्र यावेत, अशी इच्छा बोलून दाखवली. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले की, संपूर्ण देशात पवार कुटुंबाचे वलय खूप



मोठे आहे. त्यात अचानक वेगळेपणा झाल्यामुळे प्रत्येकाला वाटते की, शरद पवारांनी गंभीर आजार असतानाही आपल्यासाठी, समाजासाठी इतकी वर्ष काम करत आहेत. अजित पवार किती कामाचे आहेत, ते फक्त महाराष्ट्र नाही, तर संपूर्ण देश मान्य करतो. शरद पवार असतील किंवा अजित पवार असतील, दोघांना किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांना लोक विनंती करत असतात. अजित पवार आणि शरद पवार एकत्र आले पाहिजेत. ज्या दिवसापासून अजित पवारांसोबत आलो आहे, तेव्हापासून आजपर्यंत शरद पवार यांच्यासमोरच गेलेलो नाही. परंतु, आता शरद पवार यांची भेट घेणार, असे नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे. पाडुंरंगाच्या शेजारी शरद पवार साहेबांना पाहतो शरद पवार यांना सांगणार की, जनता आपल्याला दैवत मानते. पण राजकारणातील घडामोडींमुळे शरद पवार यांना सोडून आलो. त्यामुळे मी नर्व्हस झालो आहे. आता कोणत्या तोंडाने साहेबांसमोर जायचे, अशी अनेकांची अवस्था झालेली आहे आणि त्यांना विनंती करणार आहे की, आता एकत्र या, असे झिरवाळ म्हणाले. तसेच दोन्ही पवार एकत्र आले पाहिजे, ही पांडुरंगाला विनंती करतो. मी पाडुंरंगाच्या शेजारी पवारसाहेबांना पाहतो. साहेब निश्चित विचार करतील. राजकारणात त्याचा वापरही केला गेला. पहाटे शपथ झाली तेव्हा मी दिल्लीला पळून गेल्याची माझ्यावर टीका झाली. बजरंगाच्या छातीत प्रभू राम दिसले होते. माझी छाती फाडली तर शरद पवार साहेबच दिसतील, असे झिरवाळ यांनी सांगितले. दरम्यान, आता शरद पवार यांच्यासमोर जाऊन लोटांगण घालून पाया पडणार. आमच्या सारख्या अनेकांचे अवघड झाले आहे. याचा ते विचार करतीलच ना, असा विश्वास झिरवाळ यांनी व्यक्त केला. माझी मागणी एकच आहे. प्रत्येक माणूस तीच मागणी करत आहे, विरोधक असो किंवा राष्ट्रवादीचा कुणीही माणूस असो. सगळ्यांना वाटते की, अजितदादा आणि शरद पवार साहेब एकत्र आले पाहिजे. राजकारणात काही गोष्ट घडून गेली. आम्ही शरद पवार यांना सोडून गेलो. मात्र लोकांनी आम्हाला निवडून दिले, असे झिरवाळ यांनी नमूद केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com